# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नाशिक विभागीय मंडळ,नाशिक–४२२००३.

परिपत्रक क्र./नाविमं/लेखा/ नोंदणी शुल्क/२०२२–२३/2906 दिनांक :–११/०७/२०२२

**विषय:– नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाचे खाली नमुद केलेल्या दराने इ.१०वी /इ.१२वी च्या नियमित विद्यार्थी संख्येप्रमाणे ( मंडळ नियमावली क्र. ४७ मधील ०७ नुसार ) नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क रु.५००/– प्रमाणे दिनांक १० ऑगस्ट २०२२ पूर्वी विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाद्वारे जमा करण्यात यावेत.

| तपशिल | नोंदणी शुल्क | | शिक्षण संक्रमण शुल्क (इ.१०वी व इ.१२वी वेगवेगळी) | |
|---|---|---|---|---|
| | इ.१०वी | इ.१२वी | इ.१०वी | इ.१२वी |
| १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता | रु.१०००/– | रु.१०००/– | रु.५००/– | रु.५००/– |
| त्यापुढील प्रत्येक १००विद्यार्थ्यांसाठी | रु.२००/– | रु.४००/– | | |

उपरोक्त दराप्रमाणे नोंदणी शुल्क दिनांक १० ऑगस्ट २०२२ पूर्वी विभागीय मंडळाकडे जमा न केल्यास निर्धारित नोंदणी शुल्काव्यतिरिक्त खालील प्रमाणे दंडात्मक शुल्क भरावे लागेल. याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | तपशिल | दंडाची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | इ. १०वी | इ. १२वी |
| १ | ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२२<br>( नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नों. शुल्क + दंड शुल्क रू. २००/–) | रु.२००/– | रु.२००/– |
| २ | १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२२<br>( नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नों. शु. + दंड शुल्क रू.२००/– + रू.३००/– ) | रु.३००/– | रु.३००/– |
| ३ | १ ऑक्टोबर २०२२ नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत<br>( नियमित वि. संख्येच्या प्रमाणात नों. शु. + दंड शुल्क रू.२००/– + रू.३००/– +रू.५००/–) | रु.५००/– | रु.५००/– |

विशेष सूचना

1- नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे बँक ऑफ इंडियाच्या चलनाद्वारेच स्वतंत्ररित्या जमा करण्यात यावे.

2- नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काचा भरणा केलेले चलन शुक्रवार **दिनांक १२/०८/२०२२पर्यंत मंडळ कार्यालयात पोस्टाने किंवा हस्तपोच जमा करावे.**

3- चलनातील सर्व माहिती परिपूर्ण भरून चलनावर विद्यार्थी संख्येची नोंद करणे आवश्यक आहे.

4- **दि.१० ऑगस्ट २०२२** नंतर नोंदणी शुल्क भरल्यास नोंदणी शुल्क दंडाची रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही एकत्रित शुल्क भरणे आवश्यक राहील.

5- नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत पाठविलेल्या नमुन्यातील पत्रावर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक इ.१०वी /इ.१२वी नियमित विद्यार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकुण रक्कम, बँकेचे नाव इ.बावी नमुद केलेल्या असाव्यात.

6- ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१०वी/इ.१२वी साठी शिक्षण संक्रमण शुल्क रु ५००/– वेगवेगळे भरणे आवश्यक आहे.

7- वर्गणीचा कालावधी माहे जुलै २०२२ ते जून २०२३ असा राहील.

8- इ.१०वी/इ.१२वी साठी फेब्रुवारी/मार्च २०२३ च्या परीक्षेकरीता प्राप्त होणारे नोंदणी शुल्क हे आपण भरलेल्या विद्यार्थी संख्या व मंडळाकडे प्राप्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रांची संख्या यांची पडताळणी करण्यात येणार आहे, तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबींची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

9- अपरिहार्य कारणास्तव चलनाद्वारे शुल्क जमा करता न आल्यास मंडळ कार्यालयात रोखीने जमा करण्यात यावे.

10- या व्यतिरिक्त ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना जादा अंक पाहिजे असल्यास तसेच वैयक्तिक वर्गणीदार व इतर संस्था यांना आपली वर्गणी **सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्वे.नं.८३२ –ए फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे ४११००४** या नावे मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्मवरील मजकुरासाठी जागा (**Sender Message**) या रकान्यामध्ये (आपणास टपालाने अंक पाठविण्यासाठी) आपले संपुर्ण नांव आणि जवळच्या खुणेसह तसेच पिनकोडसह संपूर्ण पत्ता, सुवाच्य अक्षरात अचुकपणे नमूद करावा.

वरील सर्व सूचनांची नोंद घेवून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे मागील वर्षाप्रमाणे पोष्टाने किंवा हस्तपोच पाठवावे. मात्र चलन **दि.१० ऑगस्ट २०२२** पूर्वी काढलेला असावा. सदर दिनांकानंतर काढण्यात येणारे चलन दंडात्मक रक्कमेसह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. **अन्यथा या संदर्भात कोणतीही स्मरणपत्र न पाठविता मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.** याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक–४२२ ००३.

प्रति,
सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार जिल्हे.

# नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना

**नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलनासोबत**
**इ.१० वी व इ.१२ वी करीता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | | दुरध्वनी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क. म.सांकेतांक | J | | | | | | | | भ्रमणध्वनी | | | | | | | | | | |

जा.क्र./----------------
दिनांक :- --------------

प्रति,
मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक-422 003.

विषय :- **नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**
संदर्भ :- आपले परिपत्रक क्र.नांविमं/लेखा/नों.शु.व शि.सं.शु/२०२२-२०२३/२१०६ दि. ११/०७/२०२२

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून इ.१० वी /इ.१२ वी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन यासोबत पाठविण्यात येत असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**नोंदणी शुल्क (इ.१० वी/इ.१२ वी)**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | | |

**सन २०२२-२०२३ करीता नोंदणी शुल्काचा तपशिल**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

---

**शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ.१० वी/इ.१२ वी)**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | | |

**सन २०२२-२०२३ करीता शिक्षण संक्रमण अंक शुल्काचा तपशिल**
**(इ. १० वी. व इ. १२ वी. करीता शिक्षण संक्रमण शुल्क स्वतंत्रपणे वेगवेगळे भरणे आवश्यक आहे)**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | रू. ५००/— |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

**टिप:-**

1- इ.१० वी /इ.१२ वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बँक ऑफ इंडियाचे चलन वेगवेगळे पाठवावे.
2- इ.१० वी /इ.१२ वी नोंदणी शुल्काचे चलन स्वतंत्र पाठवावेत.
3- इ.१० वी /इ.१२ वी स्वतंत्र प्रपत्र पाठविणे आवश्यक आहे.